**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**

# जाहीर प्रकटन

आपत्ती सौम्यीकरण अंतर्गत (पुर प्रतिबंधक कामे) सन 2024-25 मधील ई-निविदा क्र. 1248194-1 अन्वये सिना नदी व भिंगार कॅनल खोलीकरण व रुंदीकरण करणे हे काम मंजूर असल्याने अहिल्यानगर महानगरपालिका हद्दिमधील सीना नदीचे नियमानुसार व पाटबंधारे विभागाने दिलेल्या प्रवाहाच्या वाव व काठछोरास दिलेल्या तांत्रिक मान्यतेप्रमाणे सीना नदी प्रवाह मोकळा करण्याची दृष्टीने रुंदीकरण व खोलीकरण करावयाचे काम मंजूर आहे.

अहिल्यानगर महानगरपाळिका हद्दितील एकूण 14 किलोमीटर पैकी बुरुडगाव, अहिल्यानगर येथे सुमारे तीन ते चार किलोमीटर नदी प्रथम रुंदीकरण व खोलीकरण करावयाचे असल्याने भूमापन विभागाने यापूर्वी नियमानुसार केलेल्या हद्दीखुणा पुनश्च दिनांक 27/03/2026 ते दिनांक 10/04/2026 या कालावधीत दरम्यान दाखवण्यात येणार असून या कालावधीत नदीकडचे सर्व संबंधित भूखंड धारक / शेतकरी यांनी उपस्थित राहून खुणांचे निरीक्षण करावे. त्या खुणांच्या ठिकाणी अहिल्यानगर महानगरपालिकेमार्फत पक्क्या खुणा करण्यात येणार असून त्या खुणांपासून नदीकडील भागाचे रुंदीकरण व खोलीकरण करण्यासाठी खोदाई होणार आहे.

तसेच असणारे नदीकाठी असणारे पक्के / कच्चे अतिक्रमण काढण्यात येणार आहे, याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

तसेच भूखंडाचे खुणांबाबत शंका / हरकती असल्यास मोजणी खात्याशी संपर्क करून सात दिवसाच्या आत हरकती निकाली काढणे. तर नंतर मनपा मार्फत खोदाई व रुंदीकरणाचे काम हाती घेण्यात येईल.

/-
**शहर अभियंता,**
**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**